**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६. ००)**

**रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशातील सर्वात मोठी सोलर इकोसिस्टीम नागपुरात उभी राहणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती.**
2. **परकीय गुंतवणूकदारांनी सप्टेंबर महिन्यात भारतीय शेअर बाजारातून सुमारे २० हजार ९७४ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली.**
3. **अकोला इथं डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शिवार फेरीचे आज कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते आज उद्घाटन.**

**आणि**

4. **महिला क्रिकेटमध्ये भारताची आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक; शेफाली वर्माची शतकी खेळी: महिला हॉकी संघाचीही विजयी सलामी.**

**आता सविस्तर बातम्या .......**

सोलर मॉड्युल

नागपूरच्या बुटीबोरी इथं आवाडा कंपनीच्या माध्यमातून सोलर मॉड्युलची एक सुपर फॅक्टरी उभारण्यात आली असून या मार्फत भारताला सोलर क्षेत्रात अग्रेसर करण्याचं काम होत आहे. येत्या काळात नागपूर हे सोलर मॉडेल मधील परिसंस्थेचं एक मुख्य केंद्र म्हणून उदयास येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर मध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

फडणवीस यांनी आज बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतील अवाडा ग्रुपच्या प्लांटला भेट देऊन तेथील सोलार पॅनल निर्मिती प्रक्रियेची पाहणी केली. तसेच, कंपनीच्या इतर प्रमुख उत्पादनांची आणि उत्पादन प्रक्रियेची माहिती जाणून घेतली. त्यानंतर उद्योजकांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी नवीन नागपूरच्या प्रकल्पाविषयी बोलताना या प्रकल्पासाठी पन्नास टक्के पेक्षा अधिक जागा अधिकृत झाली असून

गुंतवणुकीलाही प्रोत्साहन मिळत असल्याच सांगितल. देशातील पहिले सोलर मॉडेल अतिरिक्त बुटीबोरी क्षेत्रात तयार होत असून आवाडा समूहाला त्यांच्या प्रकल्पाच्या विस्तारासाठी 250 एकर जागेची आवश्यकता आहे. ती देण्याची घोषणाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी केली. अतिरिक्त बुटीबोरी क्षेत्रात उद्योगांसाठी अधिग्रहित केलेली जमीन संपली असून तिसरी अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक वसाहत तयार करावयाची आहे, तसेच वर्धा जिल्ह्यातील नवीन औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन सुरू असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितलं. यूपीआय आणि डिजिटल व्यवहारांमुळे व्यापाराला चालना मिळून भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत झाली आहे. त्यामुळे खर्चाची भरपाई करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या नाममात्र शुल्काला पेट्रोल पंप मालक आणि व्यापाऱ्यांनी विरोध करू नये, असं आवाहनही फडणवीस यांनी केलं.

सेवा संकल्प विशेष

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. 'जनसेवेतून देशसेवा' हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा' हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या दोन सूत्रांचा अवलंब करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत एक जिल्हा एक उत्पादन याबद्दल...

***भारतातील जिल्हा अर्थव्यवस्था अनेकदा अविभाजित राहिल्या, ज्यात स्थानिक उत्पादने आणि हस्तकलांना ब्रँडिंग, मोठे उत्पादन किंवा बाजारपेठेची उपलब्धता नव्हती. मूल्य साखळ्या कमकुवत होत्या आणि कारागिरांचे उत्पन्न कमी होते. एक जिल्हा, एक उत्पादन, भारतातील प्रत्येक जिल्हा म्हणजे एक व्यवसाय. प्रत्येक जिल्ह्याने तो जे आधीपासूनच सर्वोत्तम करत होता ते निवडले - मग ते कापड असो, फळ असो, हस्तकला असो किंवा धान्य असो - आणि राज्याने सर्व गोष्टींवर विखुरलेली मदत देण्याऐवजी त्या एकाच गोष्टीला ब्रँडिंग, जीआय टॅग, ई-कॉमर्स आणि निर्यातीसाठी मदत दिली. ज्या जिल्ह्यांना कोणतीही आर्थिक ओळख नव्हती, त्यांना ती मिळाली. कारागीर आणि शेतकरी स्थानिक बाजारपेठेच्या पलीकडे पोहोचले आणि तेही घर न सोडता. प्रत्येक जिल्ह्याला एक वैशिष्ट्यपूर्ण आर्थिक ओळख आणि बाजारपेठेचा मार्ग मिळाला.***

## परकीय गुंतवणूक

परकीय गुंतवणूकदारांनी सप्टेंबर महिन्यात भारतीय शेअर बाजारातून सुमारे २० हजार ९७४ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. परकीय गुंतवणूकदारांनी जुलै महिन्यात सुमारे २० हजार २०० कोटी रुपये तर ऑगस्ट महिन्यात २९ हजार ६३० कोटी रुपये गुंतवले होते. चालू आर्थिक वर्षात सप्टेंबर महिन्यापर्यंत परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून २ लाख ४५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. हा आकडा २०२५-२६ या आर्थिक वर्षात काढून घेतलेल्या गुंतवणुकीपेक्षा जास्त आहे. जागतिक पातळीवर वाढती अनिश्चितता, अमेरिकेत वाढते व्याज दर, कच्च्या तेलाचे वाढते दर या सगळ्याचा प्रतिकूल परिणाम भारतीय शेअर बाजारांवर दिसून येत आहे, असं मत तज्ज्ञांनी नोंदवलं आहे.

## शिवार फेरी

अकोला इथं डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या शिवार फेरीला आज उत्साहात सुरुवात झाली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते शिवार फेरी आणि चर्चा सत्राचं उद्घाटन करण्यात आलं. शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढवणं आवश्यक आहे. त्यासाठी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि अद्ययावत तंत्रज्ञान तसंच कृषी संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावं, असं आवाहन भरणे यांनी केलं. कृषी विद्यापीठातील विविध पिकांची प्रात्यक्षिकं आणि प्रयोग शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक असून, त्यांचा शेतीत अधिकाधिक वापर वाढवण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतीपूरक उद्योगांच्या वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी महाराष्ट्र कृषी उद्योजकता विकास महामंडळाच्या नागपूर इथल्या युनिटचं ऑनलाइन लोकार्पण, विद्यापीठाच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि विविध प्रकाशनांचं प्रकाशन करण्यात आलं. आजपासून सुरूझालेल्या या 3 दिवसीय शिवार फेरीचा विदर्भासह राज्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असं आवाहन कुलगुरू डॉ.शरद गडाख यांनी केलं.

## पीक परिस्थितीचा आढावा

एल निनोच्या प्रभावामुळे पावसात पडलेल्या खंडाचा परिणाम पश्चिम विदर्भातील खरीप पिकांवर झाला असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून भरीव मदत करण्यात येईल, अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. अमरावती

महसूल विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीत विभागातील पाचही जिल्ह्यांतील ५६ तालुक्यांमधील पर्जन्यमान, पावसातील खंड, पीक परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि चारा यांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हानिहाय परिस्थितीचे सादरीकरण केले. लोकप्रतिनिधींनीही शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. दरम्यान, महावितरणकडून ट्रान्सफॉर्मर वेळेत उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी लोकप्रतिनिधींनी बैठकीत मांडल्या. याची दखल घेत नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देणे आणि नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश कृषीमंत्र्यांनी दिले.

आशियाई क्रीडा स्पर्धा

जपान इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत, विविध क्रीडा प्रकारांत भारताच्या खेळाडूंची विजयी घोडदौड सुरू आहे. भारताच्या सोनम मस्कर, एलावेनिल वलावरिन आणि विदरसा विनोद या तीन महिला नेमबाजांनी १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात रौप्य पदक पटकावलं. या यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी खेळांडूचं अभिनंदन केलं आहे. आशियाई स्पर्धेत महिला क्रिकेटमध्ये दुसऱ्या उपांत्य सामन्यात भारतानं बांगलादेशाचा ११४ धावांनी पराभव केला. भारतानं प्रथम फलंदाजी करताना ४ गडी गमावून १९५ धावा केल्या होत्या. भारतीय खेळाडू शेफाली वर्मानं ४९ चेंडूत शतक झळकावलं, तर उपकर्णधार स्मृती मंधाना हिनं ३७ आणि हरमनप्रीतनं ४० धावा काढल्या. या विजयामुळे भारतीय संघाचं या स्पर्धेतलं पदक निश्चित झालं असून सुवर्ण पदकासाठी भारतीय संघाची लढत येत्या मंगळवारी श्रीलंकेशी होणार आहे. दरम्यान, आजच्या क्रिकेट सामन्यात भारताची सलामीवीर फलंदाज स्मृती मंधाना हिनं महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला. तिनं न्यूझीलँडची महिला क्रिकेटपटू सुझी बेट्स हिचा ४ हजार ७५८ धावांचा विक्रम मोडीत काढला. आजच्या सामन्यात स्मृतीनं १९ चेंडूत ३७ धावा करत ४ हजार ७८८ धावांचा विक्रम नोंदवला. या विक्रमामुळे महिला टी-२० आंतराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या ५ फलंदाजांमध्ये भारताच्या २ खेळाडूंचा समावेश झाला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर ४ हजार २८७ धावांसह या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारताच्या पुरुष आणि महिला टेबल टेनिस संघानीही आज आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात केली. या दोन्ही गटांनी गट एफ मधल्या सलामीच्या सामन्यात इंडोनेशियाचा ३-० असा

एकतर्फी पराभव केला. महिला संघात श्रीजा अकुला, दिया चितळे आणि यशस्विनी घोरपडे यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना हरवलं, तर पुरुष संघाच्या सथियान ज्ञानसेखरन, मानव ठक्कर, मनुष शहा यांनीही  आपापले सामने जिंकले. महिला हॉकीमध्येही भारतीय संघानं उजबेकिस्तानच्या संघाचा १९-० असा पराभव केला. भारतीय खेळाडू दीपिकानं ८ गोल नोंदवले, तर इशिकानं हॅटट्रिक केली. भारताचा पुढचा सामना इंडोनेशियाच्या संघाशी होणार आहे.

वेग चाचणी

वडसा-गडचिरोली नव्या ब्रॉडगेज रेल्वेमार्गाच्या वडसा-आरमोरी रेल्वेखंडाची उद्या दि. २१ सप्टेंबर रोजी रेल्वे प्रशासनाकडून पाहणी करण्यात येणार आहे. यावेळी या मार्गावर रेल्वेगाडीची वेग चाचणीही घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक, ग्रामस्थ, शेतकरी, पशुपालकांनी उद्या सकाळी 6 ते रात्री 8 वाजेपर्यंत स्वतःसह लहान मुलं आणि जनावरांना नव्या रेल्वेमार्गापासून दूर ठेवावं, असं आवाहन रेल्वे प्रशासनानं केलं आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं दिलेल्या माहितीनुसार विदर्भातील नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, वर्धा आणि गोंदिया जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची, तसंच काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याची दाट शक्यता असून इथं सावधानतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंद्रपूर, भंडारा आणि अमरावती जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची, तसंच काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, काल शनिवारी रात्री नागपूर जिल्ह्यात मोहपा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तिष्टी खुर्द इथं वीज कोसळून दोन चुलत भावांचा मृत्यू झाला.

***